▪ RNI NO. MAHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

▪ लातूर

▪ वर्ष : ७ वे, अंक नं. : ८४

▪ दि.२२ जुलै २०२६, वार : बुधवार

▪ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


## भारतात सध्या लोकशाही दिसत आहे - पोलिसांनी ओढून नेताना राहुल गांधींची प्रतिक्रिया, ताब्यात घेतलेल्या सर्वच नेत्यांची सुटका



नवी दिल्ली-, पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरुच आहे. पोलिसांनी लाठीमार केल्याचा आंदोलकांचा आरोप आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेसचे सरचिटणीस प्रियंका गांधी हेदेखील आंदोलनात उतरले आहेत. त्यांनी पंतप्रधान मोदींच्या घरासमोर ठिय्या आंदोलन केले.

**भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांची राहुल गांधींवर टीका; म्हणाले विरोधी पक्षनेते अराजकतेचे प्रतीक होत आहेत**

नवी दिल्ली – भाजपा नेते नितीन नबीन यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली असून, त्यांचे वर्तन ''अत्यंत अशोभनीय आणि निंदनीय'' असल्याचे म्हटले आहे. ''त्यांच्या वागणुकीवरून हे स्पष्ट होते की, विरोधी पक्षनेतेपदाची प्रतिष्ठा ते गांभीर्याने घेत नाहीत. राहुल गांधी हे अराजकतेचे प्रतीक बनत आहेत, असं आम्ही सातत्याने सांगत आलो आहोत. काही संसदीय पदे ही कोणत्याही एका विशिष्ट पक्षाची नसतात; पंतप्रधान हे केवळ एका पक्षाचे नेते नसून १४० कोटी नागरिकांचे निवडून आलेले प्रतिनिधी असतात,'' असं राज्यसभेचे सदस्य असलेल्या नबीन यांनी म्हटलं आहे.

**राहुल गांधी यांच्यासह सर्वच नेत्यांना रात्री उशिरा पोलिसांनी दिलं सोडून**

नवी दिल्ली – विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी तसंच कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आज विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांच्या नेतृत्वात नेते आणि कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन केलं. यावेळी जबरदस्तीनं राहुल गांधी यांच्यासह नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. नंतर रात्री उशिरा या सर्वच नेत्यांना सोडून देण्यात आलं.

**सोनिया गांधी मंदिर मार्ग पोलीस ठाण्यात दाखल**

काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी मंदिर मार्ग पोलीस ठाण्यात पोहोचल्या आहेत. लोक कल्याण मार्ग येथे आंदोलन करत असताना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या काही विरोधी पक्षनेत्यांना काही वेळापूर्वीच या पोलीस ठाण्यात आणण्यात आलं होतं.

**भारतात सध्या लोकशाही सुरू आहे–पोलिसांनी ओढून नेता राहुल गांधींची प्रतिक्रिया**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना पोलिसांनी ओढत नेले. त्यांना ताब्यात घेतल्यानंतर राहुल गांधींनी प्माध्यमांना सांगितले, ''भारतात सध्या लोकशाही सुरू आहे.''

**राहुल गांधींच्या भेटीत काय झाली चर्चा, जितेंद्र सिंह यांनी दिली माहिती**

नवी दिल्ली: लोक कल्याण मार्ग येथे काँग्रेसच्या निदर्शनादरम्यान राहुल गांधी यांची भेट घेतल्यानंतर केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह म्हणाले, ''आज दुपारनंतर आम्हाला समजले की काँग्रेस पक्षाचे नेते अचानक धरणे आंदोलनावर बसले आहेत. त्यामुळे, त्यांना अशा प्रकारच्या कृतीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करण्यासाठी आणि चर्चेसाठी पुढे येण्याचे आवाहन करण्यासाठी, सरकारने मला आणि माझ्यासोबत केंद्रीय गृहसचिवांना घटनास्थळी पाठवले. आम्ही तिथे गेलो आणि मी अत्यंत नम्रपणे राहुल गांधींना विनंती केली की, अशा प्रकारे आंदोलन करणे योग्य नाही. त्यांनी सांगितले की, जर सरकार नीट () परीक्षा, पेपरफुटी आणि त्याशी संबंधित मुद्द्यांवर संसदेत चर्चा करण्यास तयार असेल, तर ते हे धरणे आंदोलन स्थगित करण्यास तयार आहेत. मी सरकारच्या वरिष्ठ नेतृत्वाशी संपर्क साधला आणि मला कळवण्यात आले की, सरकारच्या वतीनं मी राहुल गांधींना आश्वासन देऊ शकतो की सरकार नीटबाबत सविस्तर चर्चा करण्यास तयार आहे. त्यानंतर गेल्यानंतर शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा देखील हवा आहे, असे सांगितलं नाही.

**दिल्ली पोलिसांनी राहुल गांधींना घेतलं ताब्यात, प्रियकां गांधी म्हणाल्या, आम्हाला त्यांची भीती नाही, तेच घाबरलेत**

नवी दिल्ली– लोक कल्याण मार्गावर विरोधी पक्षांचे नेते आणि कार्यकर्त्यांसह आंदोलन करत असताना दिल्ली पोलिसांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना ताब्यात घेतलं आहे. दिल्ली पोलिसांकडून ताब्यात घेतले जात असताना काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा म्हणाल्या, ''ते भित्रे आहेत. ते घाबरलेले आहेत. आम्हाला त्यांची भीती वाटत नाही. उलट तेच आम्हाला घाबरले आहेत.''

**देशभरातील आणि अगदी परदेशातीलही तरुण या आंदोलनासाठी एकत्र–जयंत पाटील**

सीजेपीच्या आंदोलनाबाबत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले, ''देशभरातील आणि अगदी परदेशातीलही तरुण या आंदोलनासाठी एकत्र आले आहेत. नीट परीक्षेबाबतची ही आंदोलने सर्वत्र प्रत्येक गल्लीत, गावात, शहरात आणि वस्तीत पसरली आहेत. कारण, केंद्र सरकार आणि शिक्षण विभाग आवश्यक ती पावले उचलण्यात अपयशी ठरले आहेत. लोकांमध्ये तीव्र संताप आहे. प्रत्येक शहरात सध्या सुरू असलेल्या आंदोलनांमधून हे स्पष्टपणे दिसून येत आहे. मला अशी माहिती मिळाली की, शरद पवार यांनी दिल्लीत उपस्थित असलेल्या आमच्या खासदारांसह आज आंदोलनाच्या ठिकाणाला भेट दिली.

## विशेष सखोल पुनरावलोकन अभियानाबाबतच्या फसव्या संदेशांपासून सावध राहण्याचे आवाहन




**लातूर/ प्रतिनिधी:** राज्यात १४ मे २०२६ पासून सुरू झालेल्या विशेष सखोल पुनरिक्षण–२०२६ (एसआयआर) अभियानाचा गैरफायदा घेऊन नागरिकांची फसवणूक करणारे आणि बनावट संदेश पाठवणारे असामाजिक तत्व सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी अशा फसव्या संदेशांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एसआयआर अभियानाच्या संदर्भात अज्ञात स्रोतांकडून प्राप्त होणाऱ्या संशयास्पद संदेशांना किंवा लिंक्सना नागरिकांनी कोणताही प्रतिसाद देऊ नये आणि आपल्या बँक खात्याची माहिती, ओटीपी किंवा इतर कोणतीही वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींसोबत शेअर करू नये. तसेच भारत निवडणूक आयोग आपल्या कोणत्याही सेवेसाठी कोणतेही शुल्क आकारत नसल्याने कोणत्याही स्वरूपाचे आर्थिक व्यवहार करू नयेत. मतदारांनी केवळ भारत निवडणूक आयोग अथवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि बीएलओ, एइआरओ किंवा इआरओ यांसारख्या अधिकृत अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन निवडणूक विभागामार्फत करण्यात आले आहे.

## विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ चा सुधारित कार्यक्रम जाहीर; अंतिम मतदार यादी १९ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

**लातूर/ प्रतिनिधी:** राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून जाहीर करण्यात आले आहे. या सुधारित कार्यक्रमनुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटींचा कालावधी ३० जून २०२६ ते ०८ ऑगस्ट २०२६ असा निश्चित करण्यात आला असून, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना ०८ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

त्यानंतर १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी मतदार याद्यांची प्रारूप प्रसिद्धी केली जाईल. नागरिक आणि भागधारकांना दावे व हरकती दाखल करण्यासाठी १७ ऑगस्ट २०२६ ते १६ सप्टेंबर २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला असून, दाखल झालेल्या नोटीस, दावे व हरकती १७ ऑगस्ट २०२६ ते १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत निकालात काढण्यात येतील. या सर्व टप्प्यांनंतर १९ ऑक्टोबर २०२६ (सोमवार) रोजी मतदार याद्यांची अंतिम प्रसिद्धी करण्यात येईल, अशी माहिती लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

## कवयित्री शैलजा कारंडे यांच्या आजही या कवितेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

**लातूर/ प्रतिनिधी:** येथील प्रसिद्ध कवी, साहित्यिक तथा अभियंता व बांधकाम व्यावसायिक



तसेच अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती लातूर जिल्हा कार्यकारिणीच्या अध्यक्ष इंजि. शैलजा कारंडे यांची सुप्रसिद्ध आजही ही कविता छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मायनर मराठी,सत्र सहावे, मराठवाड्यातील कविता, अभ्यासपत्रिका ८वी बी.ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आलेला आहे. त्याबद्दल प्रवीण सरदेशमुख, डॉ. सुनीता सांगोले, डॉ.रामचंद्र पस्तापुरे, डॉ.बालाजी भंडारे, डॉ. नयन राजमाने, डॉ.राजेश तगडपल्लेवार, डॉ. विजयकुमार ढोले, उमेश सेलूकर, डॉ.रामशेट्टी शेटकार, डॉ.बालाजी भंडारे, डॉ.प्रणिता चाकूरकर, डॉ.जयद्रथ जाधव, योगीराज माने, प्रा.अश्विनी निवर्गी, रमेश चिल्ले,जी.जी.कांबळे, भारत सातपुते, सुरेश गीर, नरसिंग इंगळे, प्रकाश घादगीने,नयन राजमाने , विश्वंभर इंगोले, ऋचा पत्की, सुलक्षणा सोनवणे, सुनीता मोरे, जना घुले, वंदना केंद्रे यांच्यासह समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## शासकीय तंत्रनिकेतन ठाणे येथे अभ्यागत अधिव्याख्यात्यांची भरती २८ जुलै रोजी थेट मुलाखती

**ठाणे/प्रतिनिधी :** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे या नामांकित संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील विषम सत्राकरिता विविध विषयांच्या अभ्यागत अधिव्याख्यात्यांची तासिका तत्वावर भरती करण्यात येणार आहे. या संदर्भातील निवड प्रक्रियेसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती रविवार, २८ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आल्या असून, उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेच्या प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या भरती प्रक्रियेअंतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी, उपयोजित यंत्रशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी आणि माहिती व तंत्रज्ञान या अभियांत्रिकी विभागांसह प्रवास व पर्यटन, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इंग्रजी व गणित या महत्त्वाच्या विषयांसाठी अध्यापकांची निवड केली जाणार आहे. या पदांसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या नियमांनुसार शैक्षणिक पात्रता निश्चित करण्यात आली आहे. अभियांत्रिकी शाखेसाठी संबंधित विषयात प्रथम श्रेणीतील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, तर रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इंग्रजी व गणित या विषयांसाठी संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असलेले उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरणार आहेत.

मुलाखतीचे आयोजन २८ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय तंत्रनिकेतन, फडके पाडा, भारत गियर्स कंपनी समोर, खार्डीगाव, मुंब्रा, ठाणे येथे करण्यात आले असून, सर्व उमेदवारांनी सकाळी १०.०० वाजेपर्यंत नोंदणीसाठी उपस्थित राहावे. इच्छुकांनी स्वतःचा अद्ययावत बायोडाटा, सर्व मूळ कागदपत्रे आणि छायांकित प्रतींच्या संचासह स्वखर्चाने मुलाखतीसाठी उपस्थित राहणे गरजेचे आहे. निवड झालेल्या उमेदवारांना प्रचलित शासन निर्णयानुसार तासिकेप्रमाणे मानधन दिले जाईल. सदर नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपातील तासिका तत्वावर असल्याने भविष्यात या सेवेवर नियमित होण्याचा कोणताही कायदेशीर हक्क किंवा दावा करता येणार नाही, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्व प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालयाच्या परिपत्रकातील निकषांनुसार पार पडेल.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक स्थळाची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी



**लातूर/ प्रतिनिधी:** जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक स्थळाची पाहणी केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फ ुटी स्मारकाची उभारणी करण्यात येत आहे.

याप्रसंगी भिक्खू पय्यानंद थेरो, लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, गटनेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, नगरसेवक आतिश चिकटे, सचिन गायकवाड, शहर अभियंता उषा काकडे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, माजी नगरसेवक चंद्रकांत चिकटे उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केली मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीची पाहणी

**लातूर/ प्रतिनिधी:** जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीला भेट दिली. यावेळी त्यांनी या इमारतीमधील सर्व कार्यालयांना भेट देवून पाहणी करत स्वच्छता व इतर बाबींचा आढावा घेतला. प्रशासकीय इमारतीच्या स्वच्छतेची जबाबदारी येथील सर्व विभाग प्रमुखांची असून सर्वांनी आपापल्या कार्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक टेकाळे, उपविभागीय अभियंता राजेंद्र बिराजदार यांच्यासह मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील कार्यालयांचे प्रमुख अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील सर्व कार्यालयांना भेट देवून तेथील स्वच्छता, अभिलेख कक्ष, भांडार कक्ष यांची पाहणी केली. कोणत्याही कार्यालयांमध्ये अनावश्यक कचरा, निरुपयोगी साहित्य जमा करून ठेवू नका. तसेच कार्यालयांच्या बाहेरील मोकळ्या जागेची स्वच्छता ही संबंधित कार्यालयाची जबाबदारी असून या इमारतीमधील सर्व शासकीय विभागांच्या कार्यालय प्रमुखांनी आपापले कार्यालय व कार्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवावा, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी दिल्या. तसेच इमारतीची काही ठिकाणी दुरुस्ती करण्याची आवश्यकता असून सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्तीची कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.



## संपादकीय...

# पंतप्रधानांच्या घरापर्यंत पोहोचलेला विरोधकांचा आवाज; लोकशाहीत संवादाची दारे उघडी राहणार का?

भारतीय लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्ष आणि विरोधक यांच्यातील संघर्ष हा नवीन नाही. मात्र, जेव्हा विरोधकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ धरणे आंदोलन करावे लागते, तेव्हा हा केवळ राजकीय संघर्षाचा विषय राहत नाही, तर सत्ताधारी आणि विरोधकांमधील संवादाच्या स्थितीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होते. आज दिल्लीमध्ये राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि अखिलेश यादव यांच्यासह विरोधकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाजवळ आंदोलन केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या आंदोलनाच्या केंद्रस्थानी विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस कारवाई, नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी असल्याचे वृत्त आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावरून विरोधकांनी सरकारवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या आंदोलनाकडे केवळ राजकीय शक्तिप्रदर्शन म्हणून न पाहता त्यामागील प्रश्न समजून घेण्याची गरज आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या आंदोलनातून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना आवाज देण्याचा प्रयत्न केला. प्रियंका गांधी यांनीही आंदोलनात सहभाग घेतला, तर समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांची उपस्थिती विरोधकांच्या एकजुटीचे चित्र निर्माण करणारी ठरली. पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ आंदोलन करणे हा राजकीयदृष्ट्या आक्रमक संदेश मानला जाऊ शकतो. मात्र, लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आणि सुरक्षा व्यवस्था यांच्यात संतुलन राखणे आवश्यक आहे. विरोधकांनी आंदोलन करताना कायद्याच्या चौकटीचे पालन करणे अपेक्षित आहे, तर प्रशासनानेही शांततापूर्ण आंदोलन हाताळताना संयम आणि प्रमाणबद्धता राखणे गरजेचे आहे. या आंदोलनादरम्यान राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि अखिलेश यादव यांच्यासह काही नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. यामुळे सरकार आणि विरोधकांमधील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. मात्र, अशा घटनांमुळे प्रश्न सुटण्याऐवजी राजकीय दरी अधिक वाढण्याची शक्यता असते. देशातील विद्यार्थी आणि युवकांच्या प्रश्नांवरून सुरू झालेला संघर्ष आता थेट राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे. परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास, कथित पेपर लीक, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न हे सर्व मुद्दे गंभीर आहेत. विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे मेहनत घेऊन स्पर्धा परीक्षांची तयारी केलेली असते. त्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षेच्या प्रक्रियेवर संशय निर्माण झाला तर त्यांच्या मनात असुरक्षितता निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे सरकारने या प्रश्नांकडे राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय महत्त्वाचा विषय म्हणून पाहिले पाहिजे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधक आणि आंदोलनकर्त्यांकडून केली जात आहे. राजीनामा द्यायचा की नाही, हा निर्णय सरकार आणि संबंधित मंत्र्यांचा असला तरी या मागणीमागील कारणांवर पारदर्शकपणे चर्चा होणे आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये विरोधकांचे काम केवळ सरकारवर टीका करणे नसते, तर जनतेच्या प्रश्नांना संसदेत आणि रस्त्यावर आवाज देणेही असते. त्याचप्रमाणे सरकारचे काम केवळ बहुमताच्या जोरावर निर्णय घेणे नसून विरोधकांचे म्हणणे ऐकून घेणेही असते. आजचा प्रश्न असा आहे की, सरकार आणि विरोधक यांच्यातील संवादाची दारे किती खुली आहेत? जर संवाद नियमित आणि प्रभावी असेल, तर विरोधकांना पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ जाऊन आंदोलन करण्याची गरज का निर्माण होते, हा प्रश्न सत्ताधाऱ्यांनीही स्वतःला विचारला पाहिजे. दुसरीकडे, विरोधकांनीही प्रत्येक प्रश्नाचे राजकारण करण्याऐवजी तोडगा काढण्यासाठी सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राजकीय फायदा मिळविण्यापेक्षा त्यांना न्याय मिळवून देणे हे सर्व पक्षांचे कर्तव्य आहे. लोकशाहीमध्ये आंदोलन हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. परंतु आंदोलन करताना कायदा-सुव्यवस्थेचे पालन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासनाने आंदोलनकर्त्यांना शत्रू समजण्याऐवजी त्यांच्या मागण्या ऐकून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज देशासमोर बेरोजगारी, शिक्षण, महागाई आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास यांसारखे अनेक प्रश्न आहेत. युवकांमध्ये निर्माण होणारी अस्वस्थता वेळेत समजून घेतली नाही, तर ती मोठ्या सामाजिक आणि राजकीय असंतोषाचे रूप घेऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारकडे प्रचंड राजकीय ताकद आहे. मात्र, खरी राजकीय ताकद विरोधकांचा आवाज दाबण्यात नसून विरोधकांचे म्हणणे ऐकून घेण्यात आहे. मजबूत सरकार हे मजबूत विरोधकांनाही सहन करू शकते, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. त्याचप्रमाणे राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि अखिलेश यादव यांच्यासारख्या विरोधी नेत्यांनीही आंदोलनाच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करताना शांततापूर्ण आणि घटनात्मक मार्गाचा अवलंब केला पाहिजे. संघर्ष तीव्र करण्यापेक्षा संवादाची शक्यता निर्माण करणे अधिक परिणामकारक ठरते. पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ झालेले आजचे आंदोलन हे भारतीय राजकारणातील वाढत्या संघर्षाचे प्रतीक मानले जाऊ शकते. परंतु हा संघर्ष केवळ रस्त्यावर किंवा पोलिसांच्या कारवाईत संपता कामा नये. त्यातून संसदेत गंभीर चर्चा आणि धोरणात्मक निर्णय घडून आले पाहिजेत. विद्यार्थ्यांचा प्रश्न असो, सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाचा विषय असो किंवा अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा संवेदनशील प्रश्न असोप्रत्येक विषयावर सरकार, संसद, न्यायपालिका आणि जनतेमध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्न न्यायालयाकडे किंवा रस्त्यावर जाण्यापूर्वी संवादातून सोडविण्याची व्यवस्था मजबूत झाली पाहिजे. आजच्या आंदोलनाने एक गोष्ट स्पष्ट केली आहेजनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले, तर तो प्रश्न शेवटी राजकीय संघर्षाच्या केंद्रस्थानी येतो. त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर पारदर्शकपणे भूमिका मांडावी आणि विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना तथ्यपूर्ण उत्तर द्यावे. लोकशाहीची खरी ताकद सत्तेच्या दडपणात नसते आणि विरोधकांची खरी ताकद केवळ आंदोलनात नसते. खरी ताकद असते ती संवादात, संविधानात आणि जनतेच्या विश्वासात. पंतप्रधानांच्या घरासमोर धरणे देण्याची वेळ येऊ नये आणि विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरण्याची गरज भासू नये, अशी लोकशाही व्यवस्था निर्माण करणे हीच आजच्या सत्ताधारी आणि विरोधकांची खरी जबाबदारी आहे.

# मंत्रिमंडळ निर्णय




### १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये एक वर्षाकरिता आकांक्षित तालुका कार्यक्रम

राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर २०२६-२७ साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नीति आयोगाने देशातील दुर्लक्षित व मागासलेल्या ११२ जिल्ह्यांमध्ये आकांक्षित जिल्हा कार्यक्रम व ५०० अल्प विकसित तालुक्यांमध्ये आकांक्षित तालुका कार्यक्रम सुरू केलेला आहे. त्यामध्ये राज्यातील ४ जिल्हे व २७ तालुक्यांचा समावेश आहे. या तालुक्यांचे आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषि आणि संलग्न सेवा, मूलभूत पायाभूत सुविधा, सामाजिक विकास क्षेत्रातील ३९ निर्देशांक यांच्या आधारे कामगिरीचे मूल्यमापन केले जाते व त्यासाठी आयोगाकडून विशेष निधी दिला जातो.

याच धर्तीवर महाराष्ट्राने संतुलित, सर्वांगीण व गतिमान विकासासाठी आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमाचा विस्तार केला असून त्यांमध्ये गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशिम, हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या १० जिल्ह्यांची व एकूण १७७ तालुक्यांची विस्तारित आकांक्षित जिल्हे व तालुके म्हणून निवड केली आहे. या नव्याने निवड करण्यात आलेल्या १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये २०२६-२७ साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली. या तालुक्यांना या वर्षासाठी ५ कोटी रूपयांचा निधी देण्यात येईल. या वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना २०२७-२८ मध्ये अतिरिक्त प्रोत्साहन निधी देण्यात येईल. हा निधी पुरस्कार स्वरूपात पहिल्या पुरस्कारासाठी १० कोटी, दुसऱ्या पुरस्कारासाठी ८ कोटी, तिसरा-६ कोटी, चौथा-४ कोटी आणि पाचवा पुरस्कार २ कोटी रूपयांचा असेल. याशिवाय सर्व क्षेत्रातील एकत्रित कामगिरीच्या आधारे पुरस्कार दिला जाईल. यात पहिला पुरस्कार २१ कोटी, दुसरा पुरस्कार-१५ कोटी आणि तिसरा पुरस्कार-११ कोटी रूपयांचा असेल.

या तालुक्यांच्या मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय अशा संनियंत्रण समित्या स्थापन केल्या जातील.

### नागपूरच्या काटोल येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय

नागपूर जिल्ह्यातील काटोल येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्याशी संलग्न शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नागपूर व अमरावती विभागातील ११ जिल्ह्यांमध्ये संत्रा, मोसंबी, आंबा, लिंबू, पेरू इत्यादी व मुख्य फळ पिकाव्यतिरिक्त कमी पाण्यावर तग धरणारी आवळा, सिताफळ या फळपिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर नागपूर जिल्ह्यातील फळे, भाजीपाला व फुलशेतीची विविधता बघता उद्यानविद्या महाविद्यालयाची आवश्यकता आहे. या महाविद्यालयामध्ये फळे, भाजीपाला, फुले तसेच, प्रक्रिया व मूल्यवर्धन या संबंधीच्या अभ्यासक्रमांचा समावेश असल्याने त्यासंबंधीच्या अभ्यास व संशोधनाला चालना मिळणार आहे.

दरवर्षी या महाविद्यालयात १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. या महाविद्यालयासाठी शिक्षकवर्गीय २९ पदे आणि शिक्षकेतर नियमित २२ पदे अशी एकूण ५१ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याचबरोबर शिक्षकवर्गीय (गट अ) (०५) आणि शिक्षकेतर (गट क) (८) व (गट ड) (२२) ची पदे आवश्यकतेनुसार कंत्राटी स्वरुपात भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पदांसाठी आवश्यक वेतन व अनुषंगिक खर्चासाठी १२२ कोटी ३२ लाख रूपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

### 'एनडीआरएफ'ला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे येथे तीन हेक्टर जमीन

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल-(एनडीआरएफ) ला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे (ता.मावळ) येथील तीन हेक्टर जमीन देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मौजे सदुंबरे येथील गायरानातील तीन हेक्टर जमीन एनडीआरएफला बाजारभावाने देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यावर या संस्थेने जनहित तथा राष्ट्रीय महत्त्व या कारणास्तव संस्थेस ही जमीन विनामूल्य मिळावी, अशी मागणी केली होती. या जमिनीवर एनडीआरएफचा कायमस्वरूपी तळ उभारण्यात येणार आहे. जिथे आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध प्रशिक्षणांसह, विविध स्वरूपाच्या आपत्तींवर मात करण्यासाठीची कृतीदले तैनात राहणार आहेत. यामुळे राज्यात आपत्कालीन स्थितीत उपाययोजना करता येईल. या दृष्टीने देशातील एकमेव अशा समर्पित नागरी दल म्हणून एनडीआरएफला ही जागा विनामूल्य भोगवटादार वर्ग-२ म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

### भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूर येथील जमीन भाडेपट्ट्यावरील मुद्रांक शुल्क माफ

मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूरमधील सुभाष रोड जागेच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ ही सार्वजनिक धर्मादाय संस्था आहे. ही संस्था राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक प्रबोधन, ग्रामविकास, व्यसनमुक्ती, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रभक्ती तसेच विविध जनकल्याणकारी उपक्रम राबवीत असते. या संस्थेला नागपूर मधील सुभाष रोड येथील १८ हजार ३४० चौ.फूट जागा शासनाने १९५४ मध्ये भाडेपट्ट्यावर उपलब्ध करून दिलेली आहे. या संस्थेने विनंती केल्यानुसार भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क लोकहितास्तव माफ करण्याचा प्रस्ताव होता. त्यास मान्यता देण्यात आली.

### लोकायुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता

लोकायुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. लोकायुक्त व उपलोकायुक्त कार्यालयाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या दोन्ही कार्यालयांसाठी यापूर्वी ८७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला होता. आता राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोकायुक्त अधिनियम २०२३ लागू केला आहे. या अधिनियमानुसार लोकायुक्त संस्थेतील सदस्यांमध्ये वाढ झाली असून त्यांच्या अधिकार क्षेत्रातही वाढ झाली आहे. त्यामुळे या कार्यालयाला प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार सध्याची मंजूर पदे ८७ अधिकची ५६ पदे (३१ नियमित, २३ बाह्ययंत्रणेद्वारे आणि २ माहिती तंत्रज्ञान कर्मचारी) अशा एकूण १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली.

# दिल्लीतील जंतर मंतर वरील आंदोलन आणि भारतीय लोकशाही...

सध्या कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी)च्या नेतृत्वाखाली राजधानी दिल्ली येथील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. आंदोलक विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने: पेपर लीक + परीक्षा घोटाळे- नीट, इतर स्पर्धा परीक्षांमधील अनियमितते विरोधात, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा- केंद्रीय शिक्षण मंत्र्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करीत आहेत.

प्रसिद्ध पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांचे उपोषण : २० दिवसांच्या उपोषणानंतर त्यांची प्रकृती बिघडल्याने सफदरजंग हॉस्पिटलमध्ये हलवले. यामुळे आंदोलन अधिक तीव्र होत असल्याचे दिसून येत आहे. सोमवारचा ''संसद चलो'' मोर्चा- हजारो विद्यार्थी रस्त्यावर आले. पोलिसांनी लाठीचार्ज, अश्रुधुराचा वापर केला. ११८ पोलीस आणि ६० आंदोलक जखमी झाले. ५ एफ आय आर दाखल झाल्या. पोलिसांनी मंच-तंबू तोडले, पण मंगळवारी आंदोलकांनी पुन्हा जागा परत घेतली आणि ''आंदोलन सुरू राहील'' असा निर्धार केला आहे. जंतर मंतर हे दिल्लीतील निषेध केंद्र '' '' आहे. इथे होणारे आंदोलन भारताच्या लोकशाहीतील विशेष गुण दाखवते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य - अनुच्छेद १९ हा नागरिकांना स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करतो. शांततापूर्वक आणि विनाशस्त्र एकत्र जमण्याचे, विचार व्यक्त करण्याचे, मत मांडण्याचे स्वातंत्र्य देतो. सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून नारे देणे, ''राजीनामा मागणे'' ही परवानगी फक्त लोकशाहीत मिळते. दिल्ली पोलिसांनी अधिकृत परवानगीही दिली आहे. ''कॉकरोच आ रहे हैं, धर्मेंद्र प्रधान जा रहे हैं'' सारखे तिखट नारेही लागतात.

सरकार आणि जनता यामधील थेट संवाद- सरकार विरोधात बोलण्याचा, मागणी मांडण्याचा, आंदोलन करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने प्रत्येकाला दिला आहे. जनता मागणी करते तेंव्हा शासन म्हणून ती ऐकून त्यावर विचार करणे, आंदोलकांशी चर्चा करणे ही जबाबदारी निश्चित होते सरकारची. संवाद नसला किंवा थांबला की अराजकता निर्माण होते. लोकशाहीवरील विश्वास कमी होतो. ''संवादातून तोडगा'' ही भारतीय लोकशाहीची ताकद आहे आणि ती आजपर्यंत झालेल्या आंदोलनातून अधोरेखित झाली आहे. देशभरातील तरुणांचा रोष, नैराश्य, नागरिकांचा वाढता पाठींबा लक्षात घेता सरकार या आंदोलनाची दखल घेईल अशी अपेक्षा बाळगायला वाव आहे. जय हिंद!



-सतीश तांदळे
ज्येष्ठ पत्रकार
माझं लातूर परिवार

# चर्चा न करता विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज,बळाचा वापर करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करणे ही लोकशाहीला काळीमा फासणारी घटना!

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज,अश्रुधुळाचा व बळाचा वापर करून शांततापूर्ण विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला गालबोट लावून घृणास्पद कार्य केले,ही लोकशाहीला कलंकित करणारी घटना म्हणावी लागेल.भारतात लोकशाही आहे व देश संविधानाने चालतो देशाचा लोकप्रतिनिधी म्हणजे सर्वेसर्वा नसून लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधि असतो.ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.देश स्वतंत्र करण्यासाठी लाखों शहिदांसह अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली तेव्हा देश स्वतंत्र झाला.त्याच्या बलिदानाची पावती म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकांना, शेतकऱ्यांना, बेरोजगारांना,विद्यार्थ्यांना न्याय देणे व देश सुरक्षित चालविने ही सरकारची प्रथम जबाबदारी असते.परंतु सरकारने नीट पेपर लिक करून महापाप केले आहे.कारण यातून लाखो डॉक्टर घडतात आणि त्याच ठिकाणी सरकारने घाला घातला व आरोग्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.याच अनुषंगाने दिनांक २० जून २०२६ पासून दिल्लीतील जंतरमंतर येथे सीजेपीच्या आंदोलनाला सुरुवात झाली.यानंतर नीट पेपर लिक प्रकरणात सरकारकडुन कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी श्री सोनम वांगचुक यांच्या लक्षात आले व त्यांनी दिनांक २८ जून २०२६ ला आमरण उपोषणाचा निर्धार केला. दिनांक २० जून ते १९ जुलै या ३० दिवसांच्या कालावधीत सरकारने उपोषण करत्यांसोबत कोणतीही चर्चा केली नाही,जर सरकारने चर्चा केली असती तर सरकार कडून दिनांक २० जुलै २०२६ हा लोकशाहीला कलंकित करणारा दिवस दिसला नसता व लाठीचार्ज, अश्धुळाचा किंवा बळाचा वापर करण्याची गरज भासली नसती. परंतु सरकारने कोणत्याही चर्चेला महत्त्व दिले नाही व चर्चेचे संपूर्ण मार्ग सरकारने बंद करून ठेवले होते आणि आता अधिवेशन काळात विद्यार्थ्यांचे आंदोलन अंगलट येणार हे पाहून व आंदोलनाची तीव्रता पाहून दिनांक २० जुलैला लाठीचार्ज,अश्धुळाचा व बळाचा वापर करण्यात आला.याला दोष पोलिस विभागाचा नसून स्वतः केंद्र सरकारचा आहे. कारण सरकारजवळ चर्चेसाठी भरपूर वेळ किंवा कालावधी उपलब्ध होता.परंतु पेपर फुटीचे पाप लपविण्यासाठी व यातील खुंखार गुन्हेगारांना वाचविण्यासाठी आणि पेपर फुटीचे खापर सरकारच्या डोक्यावर फुटु नये यासाठी सरकार चर्चा करण्यास तयार नसल्याचे स्पष्ट दिसून आले. त्यामुळेच २० जुलैला सरकारने बळाचा वापर करून आंदोलन मोडण्याचा प्रयत्न केला.सरकार म्हणते की, आंदोलन स्थळी विद्यार्थी कमी व असामाजिक तत्वाचे लोक जास्त होते त्यामुळे बळाचा वापर करण्यात आला व सरकार कडून सांगितले जाते की,या आंदोलनादरम्यान ५ आयपीएस अधिकारी सोबत ११८ पोलिस कर्मचारी आणि ६० पेक्षा जास्त आंदोलनकारी जखमी झाले व ७० लोकांना अरेस्ट करण्यात आले अशी माहिती सरकारी सुत्रांनी सांगितले आहे.सरकार आंदोलन कर्त्या विद्यार्थ्यांनपासुन बचावासाठी असामाजिक तत्वाचा वापर करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते.सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशातील विद्यार्थी वर्ग नाराज असल्याचे दिसून येते. कारण नीट पेपर लिक प्रकरणातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा देण्याचे सोडुन सरकार विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करते हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. सरकारने जनूकाय शिक्षणाचा तमाशा मांडला की काय असे चित्र देशात दिसून येते.नीट पेपर लिक प्रकरणांमध्ये महाराष्ट्रातूनच सुरूवात झाली आणि नीट पेपर लिक प्रकरणातील अनेक दिग्गज महाराष्ट्रातुन पकडल्या गेले यात पुण्यातील जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरे,प्रा. पी.व्ही.कुलकर्णी, मनीषा वाघमारे, आणि''बोगस डॉक्टर घडवणाऱ्या फॅक्टरीचा''अर्थात आयसीसीचा संचालक शिवराज मोटेगावकर यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासून देशाला बदनाम करण्याचे काम केले.यांना सरकारने लाठ्यांचे फटके मारायचे सोडून विद्यार्थ्यांवर बळाचा वापर केला ही तर शिक्षणप्रणालीवर घणाघाती प्रहार असून घोर पाप सरकारने केले आहे.यानंतर दिनांक २८ जूनला २०२६ ला होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षेची (महाटीईटी) प्रश्नपत्रिका फुटल्याचा प्रकार समोर आला आणि परिक्षा रद्द करण्यात आली अशाप्रकारे देशात अनेक पेपर फुटीचे प्रकार समोर आले असुन सुद्धा सरकार डोळे बंद करून तमाशा पहात आहे हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.यावरून स्पष्ट होते की, देशात बोगस शिक्षण प्रणालीला चालना देणारे मोठ-मोठे मासे(राजकीय पुढारी) देशात घर करून बसले आहेत व शिक्षण प्रणालीला खोकला करण्याचे काम करीत आहे. राजकीय पुढारी,आमदार-खासदार,मंत्री, वरीष्ठ अधिकारी आपल्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी पाठवितात आणि आपल्याच देशातील विद्यार्थ्यांना न्याय न देता त्यांच्यावर बळाचा वापर करतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.हा सर्व प्रकार देशातील शिक्षण प्रणालीला कलंकित करणारा आहे अशां कलंकित लोकांना फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे.कारण शिक्षणापासून लहानाचा मोठा होतो,देश घडतो आणि त्यावर सरकार एकही शब्द बोलायला तयार नाही किंवा दोषींवर कठोर कारवाई करण्यास तयार नाही ही सरकारची कोणती जबाबदारी आणि देशभक्ती म्हणावी! आजही भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत अव्वल आहे आणि ही बाब जगजाहीर आहे.आजही करोडो रूपयांचे घोटाळे करून अनेक दिग्गज विदेशात पैसा घेऊन गेले व तिथेच स्थायी झाले परंतु आपण काहीही करू शकलो नाही ही शोकांतिका आहे.आज अशोक खरात यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत व यांच्या आरोपांची ईडीने तब्बल तीन हजार पानांचे आरोपपत्र तयार केले आहे. तरीही खरातचे काहीही होणार नाही कारण आपली सिस्टीमच त्या पध्दतीची बनविली आहे.कारण अशोक खरात व रूपाली चाकणकर प्रकरण महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर गाजले तरीही या प्रकरणातील प्रमुख मासे मोकाट आहेत.देश कुठे चालला हे कळायला मार्ग नाही.कारण आज राजकीय पुढारी सत्तेसाठी आणि आपल्या वर्चस्वासाठी आमदार-खासदार फोडाफोडीचे राजकारण सुरू झाले आहे.यात आमदार-खासदार आपल्या पक्षाचे आचार-विचार,पक्षाची निष्ठा,मतदारांच्या भावना ह्या संपूर्ण बाजूला सारून सत्तेकडे धाव घेतात आणि सत्ताधाऱ्यांना त्यांचे विचार सुद्धा पटायला लागले आहेत.ज्या आमदार-खासदारांना पक्ष सोडायचा आहे त्यांनी खुशाल सोडावा यात कोणाचाही विरोध नाहीच.परंतु सर्वप्रथम आमदारकी किंवा खासदारकीचा राजीनामा देऊन पक्ष सोडायला पाहिजे.परंतु सत्ताधारी पक्ष तसे न करता सरळ पक्षात घेतात किंवा वेगळा गट करून आपलेसे करून घेतात हा तर लोकशाहीवर घणाघाती प्रहारच म्हणावा लागेल.देशाच्या करोडो लोकांचे आस्थेचे ठिकाण अयोध्येतील राममंदिर आहे. येथील दान चोरीचा मामला करोडों रूपयांचा आहे यात अनेक दिग्गज सहभागी आहेत.परंतु यात दिग्गज लोकांना या आरोपातून मुक्त करून तेथील काही कर्मचाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले आहे आणि राज्य सरकारने व केंद्र सरकारने आपली पाठ थोपटून घेतली आहे.म्हणजे सरकारने आता ''हम करे सो कायदा'' हा पवित्रा अवलंबल्याचे दिसून येते.देशात अनेक गंभीर व जटील समस्या आहेत यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या,ओला दुष्काळ,सुखा दुष्काळ,आरोग्य सुविधा, शिक्षण, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण प्रत्येक सरकारी विभागात भ्रष्टाचार,वाढत्या महागाईचा डोंगर अशा भयावह समस्या देशापुढे व देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे उभ्या येवून ठाकल्या आहेत.परंतु सरकार या जटील समस्यांकडे लक्ष न देता सत्ताधारी राजकीय पुढारी सत्तेच्या मोहात मग्न असल्याचे दिसून येते.त्यामुळे मी विनंती करतो की,महामहीम राष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट यांनी या संपूर्ण बाबींवर लक्ष केंद्रित करून देशाच्या १४५ कोटीं जनतेला न्याय द्यावा ही विनंती.जय हिंद.



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# महिलेकडून युवकाचा छळ...., केजच्या प्रकाश भांडवलकरची लातुर येथे आत्महत्या

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील सोनिजवळा येथील प्रकाश भांडवलकर ४१ वर्षे,या युवकांने लातुर येथील एका महिलेच्या छळाला कंटाळून लातुर येथे आत्महत्या केल्या प्रकरणी प्रकाश भांडवलकर यांचे वडील नानासाहेब भांडवलकर यांच्या फिर्यादी वरून लातुर येथील एका महिलेच्या विरुद्ध लातूर येथील एम.आय.डी.सी. पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. प्रकाश नानासाहेब भांडवलकर (वय ४१वर्षे , रा. सोनीजवळा, ता. केज, हे लातूर येथे हॉटेल व्यवसाय करीत होते. त्यांची पत्नी नोकरीनिमित्त माजलगाव येथे राहत असल्याने प्रकाश हे लातूरमध्ये एकटेच वास्तव्यास होते. दरम्यान हॉटेल व्यवसायाच्या निमित्ताने त्यांची ओळख रुपाली गरड उर्फ रुक्मिणी सुधीर अंधारे (रा. श्रीनगर, एम.आय. डी.सी., लातूर) या महिलेशी झाली. ओळख झाल्यानंतर संबंधित महिलेने प्रकाश भांडवलकर आणि त्यांच्या कुटुंबीयांना फोनवरुन शिवीगाळ करणे व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. या सततच्या त्रासाला कंटाळून भांडवलकर कुटुंबीयांनी १९ मे २०२६ रोजी केज पोलीस ठाण्यात यापूर्वीच तक्रार अर्ज दाखल केला होता. १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:०४ वाजता रुपाली अंधारे हिने प्रकाशच्या वडिलांना फोन केला आणि ''पप्पू शेठ गेला आहे, तुम्ही तात्काळ लातूरला या,'' असे सांगून फोन कट केला.

घटनेची माहिती मिळताच नातेवाईक व कुटुंबीयांनी लातूरच्या श्रीनगर भागातील घरी धाव घेतली. तेथे पोहोचले असता प्रकाश भांडवलकरके जमिनीवर मृतावस्थेत आढळले. घटनास्थळी उपस्थित लोकांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले.

याप्रकरणी मृत तरुणाचे वडील नानासाहेब मनोहर भांडवलकर (वय ६५, रा. सोनीजवळा, ता. केज) यांच्या फिर्यादीवरून लातूर येथील एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात रुपाली गरड उर्फ रुक्मिणी सुधीर अंधारे या महिलेविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक समाधान चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजय माधवराव पाटील हे पुढील तपास करीत आहेत.



## लोचनाबाई प्रभाकर सरवदे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त गुणी नातवांचा मान्यवर यांच्या हस्ते सन्मान





**आंबेजोगाई/प्रतिनिधी :** लोचनाबाई प्रभाकर सरवदे यांचा प्रथम स्मृतीदीन आगळ्या वेगळ्या पध्दतीने साजरा करण्यात आला. या वेळी पाली विषयाचे अभ्यासक डॉ. प्रा. कीर्तीराज लोणारे यांची धम्मदेसना झाली, या कार्यक्रमात आरक्षण उपवर्गीकरण विरोधी लाँग मार्च बीड ते मुंबई चे नेतृत्व करणारे प्रतिक उर्फ अजय सरवदे यांचा सन्मानपत्र, लोककवी वामन दादा कर्डक अकादमी च्या वतीने प्रा. गौतम गायकवाड, नागेश जोंधळे, राहुल सुरवसे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला तसेच रसायन शास्त्र विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ( पी एच डी ) प्राप्त डॉं. प्रा. किर्ती नवनाथ सरवदे यांना आई प्रतिष्ठान चे संचालक नागेश जोंधळे सन्मान चिन्ह देवुन गौरव केला या वेळी विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते सर्व उपस्थितानी कालवश लोचनाबाई सरवदे याच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

## सोनम वांगचुक यांच्या दिल्ली येथील आंदोलनास केजकरांचा पाठिंबा; विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणाऱ्या सरकारचा निषेध!



**केज/प्रतिनिधी:** नीट पेपर फूटप्रकरणी अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. या भ्रष्ट शिक्षण व्यवस्थेस जबाबदार केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा यासाठी शिक्षण तज्ञ सोनम वांगचुक यांचे दिल्ली येथे उपोषण सुरू असताना सरकारने त्यांना जबरदस्तीने रुग्णालयात दाखल केले. जंतर-मंतर मैदानावर विद्यार्थी आंदोलन करत असताना त्यांच्यावर अमानुष निर्दयपणे लाठीमार करण्यात आला.

या हल्ल्याचा निषेध करून शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा. या मागण्यासाठी मंगळवार रोजी केज शहरातुन मोर्चा काढत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. भवानी चौक ते तहसील कार्यालय इन्कलाब जिंदाबाद च्या घोषणा देत नागरिक सहभागी झाले. देण्यात नायब तहसीलदार अशोक भंडारे यांना निवेदन देण्यात आले.

मोर्चात हनुमंत भोसले, हनुमंत घाडगे, भाई मोहन गुंड ,शिवरुद्र आकुस्कर, रामदास साबळे, प्रवीण सरवदे, गजानन भांगे, शिवाजी पोळ, व्यंकट घोगले, अमोल मस्के वसंत डोईफोडे, मनोज दांगट, शिवाजी ठोंबरे, योगीराज जाधवर ,प्रकाश काळे, हिराचंद काळे ,विलास ओव्हाळ, इकबाल शेख, तात्या गवळी, दया घुंडरे, सदाशिव तांदळे, शारदा गुंड ,राधा सपकाळ, सविता आकुसकर, राधाताई सपकाळ, डॉ. हनुमंत सौदागर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिल्ली पोलिसांनी एका मुलीचे कपडे फाडले, छातीवर पाय दिला आणि काठ्या चालवल्या; अभिजीत दिपकेंचा आरोप

नवी दिल्ली : दिल्लीत सोमवारी देशभरातील तरुणांचा आक्रोश पाहायला मिळाला. सुरक्षा जवानांनी केलेला लाठीमार आणि अश्रुधुराचा माराही संतप्त तरुण वर्गाला थोपवू शकला नाही. त्यामुळे सोमवारी दिवसभर राजधानी दिल्ली तणावाखाली राहिली. पोलिसांनी केलेल्या लाठीमारामुळे अनेक आंदोलक जखमी आहे. या जखमी आंदोलकांशी आज अभिजीत दिपके यांनी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी सोमवारी झालेल्या प्रकाराबाबत माफी मागितली. तसंच त्यांनी दिल्ली पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत.अभिजित दीपके म्हणाले, आम्हाला आमचा संसद मार्च मागे घ्यावा लागला. पोलिसांनी आणखी मुलांचं डोकी फोडू नयेत, म्हणून आम्ही दोन पावलं मागे येण्याचा निर्णय घेतला. सरकारला मुलांच्या जिवाची चिंता नाही हे काल समजले. सोमवारी दिल्ली पोलीस ज्याप्रकारे काठ्या फिरवत होते, मुलांची डोकी फोडत होते, यावरुन एक लक्षात येते की, त्यांना आदेश होता की, कोणाचा जीव गेला तरी चालेल, पण या लोकांना इतकं मारा की, पुन्हा यांनी सरकारला प्रश्नच विचारले नाही पाहिजेत. पोलिसांना वॉटर कॅनन वापरता आले असते, पण पोलिसांनी अमानुष लाठीमार केला, असं अभिजीत दिपकेंनी म्हटलं आहे.

तरुणींना अमानुषपणे मारले. दिल्ली पोलिसांनी १२ वर्षाच्या मुलीचं डोकं फोडलं, १५-१६ वर्षाच्या मुलींचे गळे पकडले होते. मी एका मुलीला पोलिसांनी मारताना स्वत: बघितलं आहे. या मुलीचे कपडे पोलिसांनी फाडले आणि तिला छातीवर पाय देऊन मारलं. एका मुलीच्या गळ्यावर पोलिसांनी काठीचे फटके मारले आहेत. त्यामुळे ही तरुणी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# ठाणे जिल्ह्यात १५२ नवीन आपले सरकार सेवा केंद्र मंजूर

## नियमांचे उल्लंघन केल्यास थेट मान्यता होणार रद्द

**ठाणे/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच छताखाली आणि सहजरित्या उपलब्ध करून देण्यासाठी ठाणे जिल्हा सेतू समितीच्या बैठकीत १५२ नवीन आपले सरकार सेवा केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. या सर्व अधिकृत केंद्रांची यादी ठाणे जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून, मंजूर ठिकाणीच केंद्र चालवणे अनिवार्य राहील. शासनाच्या नियमांचे आणि अटींचे उल्लंघन करणाऱ्या किंवा नागरिकांकडून अवाजवी शुल्क उकळणाऱ्या केंद्रांवर कोणतीही पूर्वसूचना न देता थेट केंद्र रद्द करण्याची कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकारी तथा जिल्हा सेतू समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिला आहे.




दि.१६ जुलै रोजी पार पडलेल्या सेतू समितीच्या बैठकीत या नवीन केंद्रांना हिरवा कंदील दाखवण्यात आला. या सर्व केंद्रांना शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या सर्व सेवा नागरिकांना पुरवणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्रचालकांनी शासनाने ठरवून दिलेल्या वेळेनुसारच केंद्र सुरू ठेवावे, दर्शनी भागात शासनाने निश्चित केलेले ब्रँडिंग आणि हेल्पलाईन क्रमांक लावावेत, तसेच अधिकृत दरांचा तक्ता लावणे आवश्यक आहे. नागरिकांकडून ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त पैशांची आकारणी करता येणार नाही, तसेच स्वीकारल्या जाणाऱ्या रक्कमेसाठी डिजिटल पेमेंट सुविधा पुरवण्याला प्राधान्य द्यावे लागणार आहे.

नागरिकांच्या सुविधेसाठी आणि पारदर्शकतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेले दोन फलक सर्व केंद्रचालकांनी स्वतःच्या खर्चाने केंद्राच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. या क्यूआर कोडद्वारे नागरिकांना सेवेची माहिती, शुल्क आणि आपला अभिप्राय नोंदवता येणार आहे. ग्राहकांशी सौजन्याची वागणूक देणे, विविध शासकीय योजनांचे वेळापत्रक पाळणे आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. जर मंजूर केलेल्या जागेव्यतिरिक्त इतर ठिकाणी केंद्र चालवल्याचे आढळल्यास, अथवा केंद्राबाबत कोणतीही तक्रार प्राप्त होऊन त्यात तथ्य आढळल्यास संबंधित केंद्राची मान्यता तत्काळ आणि पूर्वसूचना न देता रद्द केली जाईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आदेशात नमूद केले आहे.

## अमेरिकेचे कॅनडावर ५० टक्के आयात शुल्क; शेजारी देशांमधील व्यापार तणाव वाढला

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडाच्या शेकडो उत्पादनांवर अतिरिक्त ५० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लागू केलंय. त्यांनी ओटावावर (कॅनडा सरकारवर) अमेरिकेच्या ऑटोमोबाईल्स वाहने, मद्य आणि दुग्धजन्य पदार्थाच्या निर्यातीबाबत भेदभाव केल्याचा आरोप केला आहे. या निर्णयामुळे उत्तर अमेरिकेतील या दोन शेजारी देशांमधील व्यापार तणाव आणखी वाढला आहे. १९३० च्या टॅरिफ ॲक्टमधील कलम ३३८ चा वापर करून ट्रम्प यांनी कॅनडाच्या विशिष्ट आयात वस्तूंवर नवीन शुल्क लादणाऱ्या तीन स्वतंत्र आदेशांवर स्वाक्षरी केली.

स्वाक्षरीनंतर ३० दिवसांनी हे शुल्क लागू होणार : व्हाईट हाऊसने स्पष्ट केले की, कॅनडाच्या भेदभावपूर्ण धोरणांमुळे अमेरिकन व्यापारावर पडणारा भार आणि होणारे नुकसान कमी करणे, तसेच अमेरिकन निर्यातीसाठी विशेषत: कार, मद्य आणि दुग्धजन्य पदार्थासाठी समान संधीची स्थिती (लेव्हल प्लेइंग फील्ड) निर्माण करणे हा या निर्णयाचा उद्देश आहे. व्हाईट हाऊसच्या म्हणण्यानुसार, स्वाक्षरीनंतर ३० दिवसांनी हे शुल्क लागू होणार आहे; मग त्या वस्तू 'युनायटेड स्टेट्स मेक्सिको कॅनडा करार' (ळएश्णअ) अंतर्गत विशेष सवलतीस पात्र का असेनात. हे उपाय ऊर्जा, पोटॅश, कलम २३२ अंतर्गत आधीच शुल्क लागू असलेली उत्पादने, मासे, महत्त्वपूर्ण खनिजे आणि इतर काही विशिष्ट वस्तूंना लागू होणार नाहीत.

सिमेंट आणि ग्राहकोपयोगी वस्तूंपर्यंतच्या उत्पादनांचा समावेश : प्रशासनाने नमूद केले की, नवीन शुल्कामध्ये कॅनडाच्या आयातीचा मोठा आवाका समाविष्ट आहे, ज्यामध्ये वाईन आणि हॉकी स्टिक्सपासून ते सिमेंट आणि ग्राहकोपयोगी वस्तूंपर्यंतच्या उत्पादनांचा समावेश आहे. यासोबत जोडलेल्या परिशिष्टात अतिरिक्त ५० टक्के शुल्क लागू होणाऱ्या शेकडो टॅरिफ श्रेणींची यादी दिली आहे.

व्हाईट हाऊसने म्हटले आहे की, कॅनडाने अशी धोरणे कायम ठेवली आहेत, जी अमेरिकन निर्यातदारांशी भेदभाव करतात, तर इतर व्यापार भागीदारांना अधिक अनुकूल वागणूक देतात. कॅनडाने अमेरिकन मोटार वाहनांवर असे शुल्क आणि कोटा निर्बंध लादले जे इतर देशांतून होणाऱ्या आयातीला लागू नव्हते; तसेच कोटा अशा प्रकारे व्यवस्थापित केला की, ज्यामुळे अमेरिकन उत्पादकांना अमेरिकेतील सुविधांचा विस्तार करण्याऐवजी कॅनडातील उत्पादनात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन मिळाले.

# 'ॲग्रीस्टॅक' योजनेअंतर्गत 'फार्मर आयडी' नोंदणीसाठी ३१ जुलैपर्यंत विशेष कॅम्प

## जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी :** राज्यातील कृषी क्षेत्रामध्ये डिजिटल तंत्रज्ञान व सेवांचा प्रभावी वापर करून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा जलद, पारदर्शक आणि परिणामकारक लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी केंद्र शासनामार्फत 'ॲग्रीस्टॅक' ही महत्त्वपूर्ण योजना राबवण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व खातेदार, वनपट्टाधारक आणि पीएम-किसान योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना ११ अंकी डिजिटल ओळख क्रमांक म्हणजेच 'फार्मर आयडी' वितरीत करण्यात येत असून, यासाठी ठाणे जिल्ह्यात १५ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत कृषी व महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष नोंदणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचा जिल्ह्यातील उर्वरित सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. रामेश्वर पाचे यांनी केले आहे.

या विशेष डिजिटल ओळख क्रमांकामध्ये शेतकऱ्यांचा आधार क्रमांक आणि त्यांच्या जमिनीचा सातबारा उतारा एकमेकांशी जोडला (लिंक) जात आहे. एकदा हा फार्मर आयडी तयार झाल्यानंतर शेतकऱ्यांना शासकीय योजनांच्या लाभासाठी वारंवार कागदपत्रे सादर करण्याच्या त्रासापासून पूर्णपणे मुक्ती मिळणार आहे.

पीएम-किसान योजनेसह कृषी विभागाच्या सर्वच योजनांचा लाभ मिळवण्यासाठी हा आयडी आता बंधनकारक करण्यात आला आहे. याशिवाय किसान क्रेडिट कार्ड, कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड आणि इतर बँकिंग कर्जे मिळणे अत्यंत सोपे व जलद होणार असून, बँकांना जमीन व पिकांची नोंद त्वरित तपासणे शक्य होणार आहे. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मिळणारी भरपाई थेट खात्यात जमा होण्यासोबतच किमान आधारभूत किमतीवर धान्य खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, हवामानाची अचूक माहिती मिळवणे, मृदा आरोग्याचा तपशील आणि पीकविषयक योग्य सल्ला मिळवण्यासाठी हा फार्मर आयडी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

ठाणे जिल्ह्यामधील नोंदणीच्या सद्यस्थितीचा विचार करता, जिल्ह्यात एकूण १ लाख ३८ हजार ८६२ खातेदार असून त्यापैकी ९६ हजार ९२० खातेदारांची फार्मर आयडीसाठी यशस्वी नोंदणी पूर्ण झाली आहे. विशेष म्हणजे यापूर्वी सातबारा उताऱ्यावर नाव नसल्यामुळे वनपट्टाधारकांची नोंदणी होण्यात अडचणी येत होत्या.

मात्र, आता प्रणालीमध्ये सुधारणा करून वनपट्टाधारकांनाही फार्मर आयडी देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्यांची नोंदणी प्रक्रिया वेगाने सुरू आहे. जिल्ह्यात सध्या ६ हजार ६४८ मंजूर वनपट्टाधारक असून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत ४ हजार ४०४ वनपट्टाधारकांची पडताळणी पूर्ण झाली आहे. त्यापैकी ७८२ वनपट्टाधारकांची नोंदणी आतापर्यंत पूर्ण झाली आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या थेट निर्देशानुसार आयोजित या विशेष कॅम्पचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक, आधारशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक आणि शेतजमिनीचा खाते क्रमांक ही आवश्यक माहिती सोबत ठेवावी.

नोंदणीसाठी गावातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), कृषी सहायक, ग्राम विकास अधिकारी किंवा नजीकच्या नागरी सुविधा केंद्राशी त्वरित संपर्क साधावा. तसेच ज्या वनपट्टाधारकांचे सातबारा उताऱ्यावर नाव असल्यामुळे यापूर्वीच फार्मर आयडी तयार झाला असेल, त्यांनीही ग्राम महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आपला वनपट्टा जोडून घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे पुनश्च करण्यात आले आहे.

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन मुंबईतून मजबूत होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाबोधी महाविहार, बोधगया मुक्ती आंदोलनाला महाराष्ट्राची राजधानी मुंबईतून अधिक व्यापक आणि संघटित स्वरूपात बळ देण्याच्या उद्देशाने महाबोधी महाविहार बोधगया मुक्ती आंदोलन राष्ट्रीय समितीच्या वतीने आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते वि. ल. मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत एक महत्वपूर्ण जाहिर बैठक झाली.



सदर बैठकीला जेष्ठ बौद्धचार्य प्रकाश कमलाकर जाधव, युवानेते रविभाऊ गरुड, महाबोधी आंदोलनातील सक्रिय कार्यकर्ते प्रेमानंद जगताप, संजय गायकवाड, राष्ट्रीय बौद्ध महासभेचे शेषराव घंगाले, दिलीप थोरावडे, अनिल सुटे, जितेंद्र पवार, रवींद्र रोकडे, सुभाष कांबळे, अशोक पाईकराव, आत्माराम आव्हाड, बाळासाहेब चंद्रमोरे, रवींद्र सोनावणे, गजानन मेठे, आर. आर. कोरडे, सुधाकर त्रिभुवन, हेमंत तायडे, रामजतन, उत्तम पसरटे आणि नंदेश शिर्के इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर बैठकीत गेली ५२५ दिवसापासून बुद्धगया या ठिकाणी सुरु असलेल्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी जिल्हास्तरीय कमिटी बनविण्यात यावी आणि कमिटीच्या वतीने मुंबईतील सर्व धार्मिक संघटनांना निमंत्रीत करून विश्वासात घेऊन राष्ट्रीय समितीच्या वतीने मुंबईत एक मोठी जनसभा आयोजित करण्याच्या अनुषंगाने लवकरच पुन्हा एकदा अशीच बैठक बोलवावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले तसेच आंदोलनाच्या पुढील दिशा, संघटनात्मक बांधणी आणि जनजागृती अभियानाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

सदर बैठकीचे आयोजन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन राष्ट्रीय समितीचे कार्यकारी सदस्य विजय तांबे यांनी प्रस्तावना सादर करताना आंदोलनाच्या ५२५ दिवसांचा आढावा घेत उपस्थितांच्या प्रश्नाना समाधानकारक उत्तरे दिले. सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# विलास कारखान्याच्या गळीत हंगामाची तयारी सुरू; चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते मिल रोलरचे पूजन

**लातूर/प्रतिनिधी :** विलास सहकारी साखर कारखाना, लि., वैशालीनगर, निवळी ता. जि. लातूर येथील कारखान्यात गळीत हंगाम वेळेवर आणि पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे केली जात आहेत. याच तयारीचा एक भाग म्हणून मंगळवार दि. २१ जुलै २०२६ रोजी कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख आणि संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आला. या पूजनानंतर संचालकांच्या उपस्थितीत गळीत हंगाम तयारीबाबत आढावा बैठकही संपन्न झाली.



येणारा हंगाम यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन

विलास कारखाना कार्यक्षेत्रात गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये कार्यक्षेत्रातील ऊसाचे वेळेवर गाळप होण्यासाठी कारखान्याचे संस्थापक चेअरमन, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी गळीत हंगाम लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने तयारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या अनुषंगाने सर्व हंगामपूर्व यंत्रसामुग्री देखभाल व दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून, मागील गळीत हंगामाप्रमाणेच येणारा हंगाम २०२६-२७ यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे.

ऊस तोडणीचे यांत्रिकीकरण

आगामी गळीत हंगामासाठी कारखाना कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध आहे. कारखान्याकडे सभासदांच्या १४७१९.७८ हेक्टर तर बिगर सभासदांच्या ६११३.०९ हेक्टर अशी एकूण २१०३२.८७ हेक्टर ऊसाची नोंद झालेली आहे. विलास साखर कारखान्याने ऊस तोडणीचे योग्य नियोजन केले असून, या हंगामात जास्तीत जास्त ऊस हा तोडणीयंत्राद्वारे तोडणी करण्यात येणार आहे. भविष्यात ऊसाची उपलब्धता पाहता, १०० टक्के ऊस तोडणी यंत्राद्वारे केल्यानंतर ऊसाचे गाळप करण्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी बसविण्यात येत आहे.

या हंगामात तांत्रिक कारणांमुळे कारखाना बंद तास कमी राहतील याची दक्षता घेतली जाणार आहे. हंगाम बंद असताना सुरू असलेली मशिनरी देखभाल व दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून, लवकरच कारखाना गळीत हंगामासाठी सज्ज असेल अशी कारखान्याचे कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी ही माहिती दिली आहे.

यशस्वी वाटचाल आणि विक्रमी ऊसदर

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून उभा राहिलेला विलास सहकारी साखर कारखाना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या कुशल नियोजनानुसार, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर जि.म.स.बँकेचे चेअरमन, धीरज विलासराव देशमुख आणि कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल करत आहे. विलास सहकारी साखर कारखान्याने मागील गळीत हंगामात ऊस उत्पादकांना प्रति मे.टन रु. ३१७१/- इतका उच्चांकी दर दिला आहे. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये मोठे आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण आहे. या विक्रमी दरामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत झाली असून, कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

मील रोलर पूजन कार्यक्रमास माजी आमदार तथा व्हा.चेअरमन वैजनाथराव शिंदे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, सर्वश्री संचालक रवींद्र काळे, अमृत जाधव, अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील,रसूल पटेल, तात्यासाहेब पालकर, दिपक बनसोडे, सौ.लताबाई देशमुख, सुभाष माने, ऊस उत्पादक सभासद रमेश देशमुख व खातेप्रमुख, विभाग प्रमुख तसेच कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## बालरंगभूमी परिषदेच्या वतीने इतिहास महाराष्ट्राचा स्पर्धेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा लातूर च्या वतीने ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'' यांच्या जीवन कार्यावर ''इतिहास महाराष्ट्राचा'' ही बालकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्राथमिक फेरी येत्या ०२ ऑगस्ट २०२६, रविवार रोजी, निश्चय संस्कृत क्लासेस, ट्युशन एरिया, सूतमील रोड, लातूर येथे होणार आहे. एकल वयोगट १. ( वय वर्ष ५ ते १० वर्ष ), एकल वयोगट २. ( वय ११ ते १५ वर्षे ) असेल तर समूह वयोगट ( वय ५ ते १५ वर्षे ) असणार आहे.

एकल गटात सादरीकरणाकरीता अवधी जास्तीत जास्त ५ मिनिट असून समूह गटाकरीता जास्तीत जास्त ८ मिनिटे असेल. एकल गट १ मध्ये सहभागी स्पर्धक यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या बालपणातील घटना, शौर्य, शिक्षण, पराक्रम, प्रेरणा याबद्दल एकपात्री अभिनय, स्वगत, नाट्य, नृत्य यांच्या समन्वयाने प्रभावी सादरीकरण करणे अपेक्षित आहे. एकल गट २ आणि समूह गट मधील सहभागी स्पर्धक/ संघ यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य जास्तीत जास्त शौर्य घटना, विविध प्रसंग, पराक्रम आदी घटनांचे जास्तीत जास्त संदर्भ घेत सादरीकरण करावं. या सादरीकरणात कमीत कमी ४ आणि जास्तीत जास्त ८ बालकांचा सहभाग असावा. समूह सादरीकरणामध्ये नृत्य, नाट्य, संगीत प्रकारांचा समन्वय करून सादरीकरण प्रभावी करता येईल.

या प्राथमिक फेरी मधून निवड झालेल्यांची अंतिम फेरी अहिल्यानगर येथे दिनांक ०९ ऑगस्ट २०२६ रविवारी रोजी आयोजित करण्यात येईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. या स्पर्धेसाठी संपर्क अध्यक्ष रणजित आचार्य ८४४६८६५९०८, स्पर्धा प्रमुख महेश बिडवे ९८३४३३८१७६, आणि विशाल वाटवडे ९३५६८०८६८४ यांना करावा. जास्तीत जास्त बाल स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा लातूर च्या वतीने करण्यात आले आहे.

## पुणे-आळंदी-पंढरपूर सायकलवारीचा समारोप



**लातूर/प्रतिनिधी :** माणूस प्रतिष्ठान संचालित माझं घरचे प्रमुख शरद झरे, डॉ. विनोद चव्हाण, यांच्यासह अन्य सायकलपटूंनी वाचनसंस्कृती जागृतीसाठी काढलेल्या पुणे-आळंद-पंढरपुर या सायकल वारीचा सोमवारी (ता.२०) समारोप झाला.

माझं घरचे प्रमुख शरद झरे, डॉ. विनोद चव्हाण, होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटिज (एचएआरसी), परभणीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांच्या पुढाकाराने पाच ते सहा सायकलपटूंसह सामाजिक कार्यकर्त्यांनी वाचन संस्कृतीचा प्रसार, पर्यावरण संरक्षण, इंधन बचत आणि सायकल संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी पुणेआळंदीपंढरपूर हि सायकलवारी आयोजित केली होती. या मोहिमेदरम्यान सायकलपटूंनी मार्गातील नागरिक, विद्यार्थी आणि वारकरी यांच्याशी संवाद साधत मोबाइलला सुट्टी, पुस्तकाशी गट्टी, वाचाल तर वाचाल, सायकल चालवा- इंधन वाचवा, आरोग्य जपा आणि झाडे लावा, पर्यावरण वाचवा हे सामाजिक संदेश प्रभावीपणे पोचविले. या सायकलवारीत माझं घरचे प्रमुख शरद झरे, डॉ. विनोद चव्हाण, होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटिज (एचएआरसी), परभणीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भगवान केंद्रे, उद्योजक पांडुरंग मोरे, सायकलप्रेमी राहुल राठोड, अर्जुन कांबळे सहभागी झाले होते. सायकलवारीचा समारोप माझं घर येथे करण्यात आला. यावेळी सामाजिक जनजागृतीसाठी सायकलचा प्रभावी माध्यम म्हणून उपयोग करण्याचा संकल्प सहभागी सदस्यांनी व्यक्त केला.

भिगवण सायकलिंग ग्रुपचे संजय चौधरी, डॉ. जयप्रकाश खरड, उरळी येथील डॉ. शैलेश गायकवाड, पाटस येथील नवनाथ शिरोळे, जगताप, वेळापूर येथील सूर्यकांत भिसे, पालवी एड्स प्रकल्पाच्या संस्थापक मंगल शहा यांनी सायकलवारीचे स्वागत केले.

## दौंडमधील कॅश डिपॉझिट मशीनमध्ये भरल्या बनावट नोटा, पाच आरोपींना अटक

**दौंड/प्रतिनिधी :** दौंड शहरातील ॲक्सिस बँकच्या कॅश डिपॉझिट मशीनमध्ये बनावट पाचशे रुपयांच्या १० नोटा जमा करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी दौंड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दौंड पोलिसांनी बनावट नोटा प्रकरणात मोठी कारवाई केली असून, ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या आरोपींना ७ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली असल्याची माहिती दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी दिली.

१६ जुलै रोजी रोजी पहाटे ॲक्सिस बँक दौंड शाखेच्या कॅश डिपॉझीट मशीनमध्ये एका सेव्हिंग अकाऊंटवरुन ५०० रुपयांच्या १० खोट्या नोटा भरण्यात आल्या होत्या. याबाबत ॲक्सिस बँक दौंड शाखेचे मॅनेजर महेश दत्तात्रय माने यांनी दौंड पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. याबाबत दौंड पोलीस स्टेशनमध्ये बनावट नोटा जमा करण्याचा गुन्हा पाच आरोपींविरोधात दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या पाच जणांना ताब्यात घेऊन २० जुलैला अटक केली. हितेश चिदानंद चलवादी, प्रेम संजय मंजुळे, विनोद विष्णू मुंडे, रणजीत भास्करराव डिग्रज, ओमकार सतीश मोरे अशी अटक केलेल्या पाच आरोपींची नावं आहेत. या पाच अटक आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आलं असता न्यायालयानं त्यांना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या आरोपींच्या राहत्या ठिकाणी झडती घेण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती दौंड पोलिसांनी दिली आहे.

## 'इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७' साठी लातूर जिल्ह्यातील युवकांना नोंदणीचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जगातील सर्वात मोठ्या कौशल्य स्पर्धांपैकी एक असलेल्या इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ मध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील २३ वर्षांखालील तरुणांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टतेला चालना देणारी ही स्पर्धा दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. या स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कौन्सिल तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने ६३ क्षेत्रांशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरीय स्किल कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात येणार आहे. यातून प्रथम जिल्हास्तर, त्यानंतर विभागस्तर आणि शेवटी निवड झालेल्या गुणवंत उमेदवारांना राष्ट्रीय स्तरावरील नामांकनासाठी पाठवले जाणार आहे.

या स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव मुख्य पात्रता निकष असून उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे, तसेच विविध कौशल्य प्रकारांनुसार आवश्यक ती वयोमर्यादा लागू राहील. स्पर्धेमध्ये रोबोटिक्स, ३डी डिजिटल गेम आर्ट, सायबर सिक्युरिटी, आयटी सॉफ्टवेअर सोल्युशन्स, इंजिनिअरिंग व मॅन्युफॅक्चरिंग, वेल्डिंग, सीएनसी टर्निंग, मेकॅट्रॉनिक्स, फाउंड्री, फॅब्रिकेशन, क्रिएटिव्ह आर्ट्स, फॅशन टेक्नॉलॉजी, ग्राफिक डिझाईन, हेअरड्रेसिंग, व्हिज्युअल मर्चेंडायझिंग, बेकरी, हॉटेल रिसेप्शन आणि ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी यांसारख्या ६३ हून अधिक आधुनिक व पारंपरिक कौशल्य प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

इच्छुक उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in/home// या अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन आपली नोंदणी करावी. तसेच सर्व व्यावसायिक संस्था, प्रशिक्षण संस्था व औद्योगिक आस्थापनांनी आपल्या विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व कामगारांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त नि.ना. सूर्यवंशी यांनी केले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र युवकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा आणि अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला परिसर, क्रीडा संकुल समोर, औसा रोड, लातूर - ४१३५१२ या पत्त्यावर अथवा ०२३८२-२९९४६२, ८०५५९९२९०० (लहु भंडारे) व laturrojgar@gmail.com या संपर्क माध्यमांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


## आंदोलनात काहीजण स्वत:चा अजेंडा घेऊन शिरले; फडणवीसांची प्रतिक्रिया

**मुंबई/प्रतिनिधी :** दिल्लीतील आंदोलनात मोठा हिंसाचार उफाळून आल्यानंतर देशभर याची मोठी चर्चा झाली. हजारो तरुण या आंदोलनात सहभागी झाले होते. परंतु, या आंदोलनात काहीजण अजेंडा घेऊन आले होते, असाही दावा करण्यात येतोय. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या आंदोलनावर टीका केली. ते आज माध्यमांशी बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांना आहे. लोकशाहीत आंदोलन करताना संविधानाने दिलेले हक्क आणि टाकलेली जबाबदारी लक्षात घेतली पाहिजे. कोणीही परवानगी घेऊन शांततेत आंदोलन करत असेल, तर अशा आंदोलनाला परवानगीही दिली जाईल आणि असे आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. जाणीवपूर्वक राजकीय अशांतता निर्माण करण्याकरता आंदोलने करणं, हिंसा करणं हे कोणत्याही परिस्थितीत योग्य नाही. त्यावर आवश्यक ती कारवाई केली जाईल. कोणतंही आंदोलन हे फेसलेस असतं तेव्हा काही प्रवृत्ती त्या आंदोलनात शिरत असतात. या प्रवृत्ती आंदोलनाच्या खांद्यावर बंदूक ठेवून, आपला स्वार्थ कसा पूर्ण करता येतील, असा प्रयत्न करत असतात'', असं फडणवीस म्हणाले.

## अभंगांच्या सुरांतून विठ्ठलनामाचा गजर; 'भक्तिरंग'मधून लातूरमध्ये रंगणार संगीतमय वारी

### आषाढी एकादशीनिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २४ जुलै रोजी विशेष आयोजन; नामवंत गायक आणि वादक कलाकारांच्या सादरीकरणातून भक्तिरसाची अनुभूती

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त 'भक्तिरंग एक संगीतमय वारी' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता दयानंद सभागृह, लातूर येथे हा कार्यक्रम सादर होणार आहे.



'भक्तिरंग एक संगीतमय वारी' हा संतवाणी, अभंग आणि भक्तिसंगीताच्या माध्यमातून आषाढी एकादशीच्या भक्तिभावाचा अनुभव देणारा विशेष सांगीतिक कार्यक्रम आहे. विठ्ठलभक्ती, संतपरंपरा आणि वारकरी सांस्कृतिक परंपरेतील भक्तिरचनांचा सुरेल आविष्कार या कार्यक्रमातून साकारला जाणार आहे. भक्ती, संगीत आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सुरेख संगम साधणारा हा कार्यक्रम लातूरकर रसिकांसाठी एक वेगळा आणि संस्मरणीय सांगीतिक अनुभव ठरणार आहे.

या कार्यक्रमात विठ्ठल जगताप, मधुवंती बोरगांवकर, शिवरुद्र स्वामी, लक्ष्मण श्रीमंगले आणि अनिरुद्ध वाघचौरे हे गायक कलाकार भक्तिगीते, अभंग आणि संतवाणीचे सादरीकरण करणार आहेत. संगीत संयोजन डॉ. राम बोरगांवकर यांचे असून, कार्यक्रमाचे निवेदन उद्धव फड करणार आहेत.

कार्यक्रमात सतीश काळे आणि गणेश बोरगांवकर (तबला), सुरेश फडतरे (हार्मोनियम), विश्वनाथ स्वामी (तालवाद्य), पंकज शिरभाते (व्हायोलीन), प्रसन्न बराटे आणि तुकाराम आव्हाड (पखावज) हे कलाकार साथसंगत करणार आहेत. विविध वाद्यांच्या सुरेल साथीने भक्तिसंगीताचा हा सांगीतिक सोहळा अधिक रंगतदार होणार आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनात आषाढी एकादशी तसेच पंढरपूरची वारी यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संतपरंपरेतील संतांच्या अभंगवाणीने महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेला समृद्ध केले आहे. या समृद्ध संतपरंपरेचा आणि वारकरी सांस्कृतिक वारशाचा परिचय अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'भक्तिरंग एक संगीतमय वारी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याबरोबरच संतपरंपरा, अभंग आणि भक्तिसंगीत अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, लातूर व परिसरातील वारकरी, विठ्ठलभक्त, संगीतप्रेमी, कला रसिक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिरसपूर्ण सांगीतिक वारीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे कातपूर येथे जिल्हा उद्योग केंद्राच्या योजनांची जनजागृती

**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने कातपूर येथे जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची जनजागृती करण्यात आली.



राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ट्वेंटीवन ॲग्री लि.च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला फाऊंडेशन च्या माध्यमातून महिलांना कौशल्यावर आधारित विविध प्रशिक्षण देण्यात येथे आहे. प्रशिक्षणाबरोबरच महिलांना आर्थिक दृष्ट्या मजबूत करण्यासाठी स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी स्वतःचा उद्योग उभा करण्यासाठी अशा योजनांची ही मदत होईल

यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी लक्ष्मीकांत कैले, व्यवसाय सुविधा केंद्र, आदित्य देशमुख, तांत्रिक व्यवस्थापक (टेक्नॉलॉजी मॅनेजर) तसेच फिल्ड ऑफिसर प्रतीक देशमुख यांनी उपस्थित नागरिकांना शासनाच्या विविध उद्योग व स्वयंरोजगार योजनांची सविस्तर माहिती दिली. उद्योग सुरू करण्यासाठी उपलब्ध अनुदान, कर्ज योजना, प्रशिक्षण, कागदपत्राची माहिती, अर्ज करण्याची प्रक्रिया आणि उद्योजकता विकासाच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे, कातपूरचे उपसरपंच मनोज देशमुख, विलासराव देशमुख फाउंडेशनचे समन्वयक गजानन बोयणे, सोशल प्लॅनर सोमनाथ कावळे तसेच कातपूर परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विविध योजनांबाबत प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. या जनजागृती कार्यक्रमामुळे शासनाच्या उद्योगविषयक योजना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.